स्वाभिमानी दिवाळी अंकासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा) : स्वाभिमानी प्रतिष्ठानतर्फे प्रसिद्ध होणाऱ्या दिवाळी अंकासाठी १५ ऑक्टोबरपर्यंत साहित्य पाठविण्याचे आवाहन स्वाभिमानी विचारतर्फे करण्यात आले आहे. यावर्षीच्या दिवाळी अंकाचा बदलते जीवन... ग्रामीण समाजाचे आरोग्य हा विषय असून सदर दिवाळी अंकासाठी जाहिरातदार व लेखकांनी १५ ऑक्टोबरपर्यंत खासदार राजू शेट्टी जनसंपर्क कार्यालय, पोलिस स्टेशनसमोर, ९ वी गल्ली, जयसिंगपूर, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर येथील पत्त्यावर पाठवावे. संपर्कासाठी फोन : (०२३२२) २२४३४७, मोबा. ९५०३२२५६३५ जाहिरातदारांनी आपला डी.डी. वरील पत्त्यावर दि. १५ ऑक्टोबरपर्यंत पोहोचेल याची दक्षता घ्यावी.

स्वाभिमानी विचार
Book-Post
प्रति,
RNI No. - MAH/MAR/2005/16213
Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ५ ‖ अंक २० ‖ १५ सप्टेंबर २०१० ‖ किंमत ५ रुपये ‖ पाने १२
RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11
स्वाभिमानी विचार
संपादक : खासदार राजू शेट्टी
दुसऱ्यांदा संधी

'स्वाभिमानी'ची नववी ऊस परिषद १५ ऑक्टोबरला

खासदार राजू शेट्टी यांची जयसिंगपूर येथील जिल्हा बैठकीत घोषणा

जयसिंगपूर : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हा बैठकीत कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना खासदार राजू शेट्टी. शेजारी उपस्थित जनसमुदाय.

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा) : स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने घेण्यात येणारी यंदाची ९ वी ऊस परिषद १५ ऑक्टोबर २०१० रोजी जयसिंगपूर येथे घेण्यात येणार असल्याची महत्त्वपूर्ण घोषणा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी येथे झालेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हा बैठकीत केली. नुकसानीच झालेल्या ग्रामपंचायत निवडणुकीत निवडून आलेल्या स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या सरपंच व सदस्यांचा जाहीर सत्कार कार्यक्रम येथील कल्पवृक्ष गार्डन येथे घेण्यात आला. याप्रसंगी ही घोषणा केली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भाऊसाहेब रजपूत होते.

यावेळी बोलताना खासदार राजू शेट्टी म्हणाले, "देशात उसाचे क्षेत्र वाढल्याचा सांगण्या साखरसम्राटांकडून तसेच शासनाकडून होत आहे. सध्या देशात ५० लाख हेक्टर उसाचे क्षेत्र वाढले आहे. सुमारे चारसो साखर कारखाने उसाचे गाळप करणार असून यंदा साखरेचे विक्रमी उत्पादन होईल, असे चित्र कृषीमंत्र्यांच्या पत्रे केले आहे. कृषी मंत्रालयाकडून सांगण्यात येत आहे की, यंदा साखरेचे विक्रमी उत्पादन होऊन बाजारातील साखरेचे भाव कोसळतील आणि शेतकऱ्यांना यंदा दर कमी मिळेल. असला पाजिल प्रकार स्वाभिमानी शेतकरी संघटना अजिबात खपवून घेणार नाही. वस्तुस्थिती मात्र वेगळीच आहे. सध्या जागतिक बाजारपेठेत साखरेचे भाव तेजीत आहेत. पाकिस्तानमध्ये ७५ रुपये किलोने साखर

पान ४ वर ▸

मुश्रीफसाहेब कायद्याचा आदर करा...

कामगारमंत्री हसन मुश्रीफसाहेबांनी नुकताच एक कबुलनामा जाहीर केला आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या महापौर निवडणुकीत आम्ही नगरसेवकांना पैसे देऊन मतांसाठी घोडेबाजार केलो असल्याची प्रांजळ कबुली रमजानच्या पवित्र महिन्यात दिली आहे. ना. मुश्रीफसाहेबांनी खरोखरच रमजानच्या पवित्र्य महिना समोर ठेवून कबुली दिली असली तरी त्याचे प्रायश्चित्त्य घेतलेच पाहिजे. अन्यथा काळ तुम्हाला माफ करणार नाही.

साठमारीच्या राजकारणात नि सत्तेच्या हव्यासापोटी ना. मुश्रीफांनी केलेल्या चुकांची प्रांजळपणे कबुली दिली. मतदानासाठी घोडेबाजार करून लाचार नगरसेवकांना पैसे चारून मते विकत घेतली असल्याचे स्पष्ट झाले आहे. कोल्हापूर महानगरपालिकेचा कारभार पाहिल्यास जो तो आपल्याकडे सत्ता ठेवण्यासाठी वाट्टेल ती किंमत मोजण्याची तयारी ठेवतात. नगरसेवक पद म्हणजे आपल्या भागाचा विकास करून तेथील नागरिकांच्या समस्या सोडवण्यासाठी व त्यांच्या उत्कर्ष साधण्यासाठी एक नामी संधी असते. मात्र ही सगळी पदे पैशापुढे विकली जातात. गतवर्षी महापौर पदाच्या निवडणुकीत सत्तेचा घोडेबाजार झाला. प्रत्येक नगरसेवकाला लाखो रूपयांचा मलिदा चारण्यात आला. पैशापुढे महानगरपालिकेतील नगरसेवक लाचार होऊन आपल्या मते पैशाच्या पारड्यात टाकली. ना. हसन मुश्रीफांनी सरळ सरळ कबूल करून देखील त्यांच्यावर कोणच कारवाई करत नाही? मग राज्यात कायद्याचे राज्य आहे की नाही? जनतेला अंधारात ठेवून पैशाचे राजकारण करूनही मुश्रीफसाहेब कसे काय गप्प आहेत? त्यांनी स्वत:हून मंत्रीपदाचा राजीनामा देऊन राजकारणातून पायउतार होणे गरजेचे आहे. कायदा हा सर्वांसाठी समान असतो. मात्र त्याची पायमल्ली होताना सरकार गप्प बसत नाही. सर्वसामान्य जनतेने कायद्याची पायमल्ली केले तर त्याला शिक्षाही दिलीच जाते. मग हा न्याय सरकारमधल्या एका मंत्र्याला का लागू होत नाही? जनतेचा राज्य आहे की लाचार पैसे देऊन मते विकत घेणाऱ्या मंत्र्यांचे !

हसन मुश्रीफ साहेबांनी चुकांची कबुली दिली. पैसे वाटून घोडेबाजार केलो. कारण विकासकामे करण्यासाठी आमच्यापुढे दुसरा पर्यायच उपलब्ध नव्हता. म्हणून आम्ही पैसे वाटून घोडेबाजार केलो नि मते विकत घेऊन सत्ता अबाधित ठेवली. तरीही आम्ही विकासकामे करण्यात मागे पडले आहोत अशीही त्यांनी कबुली दिलेली आहे. ना. हसन मुश्रीफसाहेबांच्यावर सरकारने कारवाई करून त्यांना त्वरीत अटक केली पाहिजे. तसेच त्यांच्यावर खटला दाखल गेला पाहिजे. हसन मुश्रीफ यांच्याबरोबरच लाचार होऊन पैसे घेतलेल्या नालायक नगरसेवकांच्यावरही कारवाई केली गेली पाहिजे. जनतेचे राज्य येण्यासाठी अनेक समाजसुधारक धडपडत असतात. मात्र येथे पैसे खाण्यासाठी नगरसेवक निवडून येण्यासाठी धडपडत आहेत. ही लोकशाहीच्या दृष्टीने लाजीरवाणी गोष्ट आहे. मुश्रीफसाहेबांनी रमजानच्या पवित्र महिन्यात चुकांची कबुली दिली. मुश्रीफ साहेब स्वत:ला श्रावण बाळ मानतात. म्हणजेच वृध्द लोकांचा आधारस्तंभ म्हणून टेंभा मिरवतात. मग असला कारभार करणे म्हणजे हे कशाचे द्योतक आहे. पैशाचे राजकारण करून मुश्रीफसाहेबांनी आपली राजकीय पोळी भाजून घेतली. कागल तालुक्यातील गुंडगिरी सर्वांनाच ज्ञात आहे. एकीकडे समाजसेवेचा व्रत घेतला असल्याचा पुळका करायता नि दुसरीकडे पैशाचे राजकारण करून लोकांना लुबाडायचे. हे आणखी किती दिवस चालणार.

ना. मुश्रीफसाहेबांनी गेल्या महिन्यात एक वक्तव्य केले होते, की वरिष्ठ अधिकारी म्हणून पुरूष सक्षम असतो. नंतर त्यांनी माफी मागून केलेल्या विधानांची सारावासारव केली. जिल्हा बँकेतील घोटाळा सर्वज्ञात आहे. शेतकऱ्यांच्या डोळ्यात धुळफेक करून संचालकांनी बोगस कर्जे काढून बँकेचीच वाट लावली. या महाघोटाळ्याला सर्वस्वी ना. हसन मुश्रीफसाहेबच जबाबदार आहेत. घोटाळ्याच्या महामालिका करून निर्विकार चेहऱ्याने सत्ता उपभोगताना सगळी लक्तरे वेशीवर टांगली असल्याचे चित्र दिसते. जनतेच्या पैशावर राजकारण करायचे मग जनतेलाच पैसे वाटून गरिबांचा कैवारी म्हणून शेखी मिरवायची नि वृध्दांचा श्रावणबाळ कावड घेऊन वृत्तपत्रात जाहिराती द्यायच्या. मग सगळा ढोंगी कारभार आतातरी बंद करावा. सत्य समोर आले तरी ढोंगीपणा सोडलेले दिसत नाही. अंहकार वृत्तीने पछाडलेला माणूस समाजकार्यांचा वसा घेतल्याचा चित्र जनतेसमोर मांडले जात आहे. आता तरी थांबा! समाजाचे दातृत्व स्वीकारला असल्याचा ढोंगीपणा किती दिवस करणार? चित्रपटात दाखवले जायचे एक नायक असतो रात्री चोरी करतो नि सकाळी गोरगरीबांना वाटतो. नंतर तो हिरो होतो. नेमका तसाच प्रसंग कोल्हापूर जिल्हात घडत आहे. कोल्हापूर महानगरपालिकेच्या निवडणुकीत घोडेबाजर केले असल्याची कबुली दिली. चोरांचा बाजार भरला जातो तरीही कारवाई केली जात नाही. सरकार काय झोपा काढत आहे काय? मुश्रीफसाहेबांनी गुन्हा कबूल केला आहे. त्यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे त्यांना सत्तेवर राहण्याचा अधिकार नाही. खरच त्यांच्यात हिम्मत असेल तर त्यांनी राजीनामा देऊन केलेल्या चुकांचे प्रायश्चित्य घेतले पाहिजे. नाहीतर जनता पुन्हा तुम्हाला माफ करणार नाही.

संपादकीय

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

◆ वर्ष ५ ◆ अंक २० ◆१५ सप्टेंबर २०१० ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
◆ **मानदसल्लागार :** मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या. बी. जी. कोळसे पाटील पुणे,
. प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी
◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

SWABHIMANI VICHAR (Fortnightly) स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी रु. १००/-

विदर्भात पुन्हा शेतकऱ्यांच्या आत्महत्या

नागपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): विदर्भात आणखी चार शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याची बाब उघडकीस आलेली आहे. पोळा, गणेशोत्सवाच्या सणांच्या दिवसांत या चौघांनी आत्महत्या केल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

लाडखेड: येथून जवळच असलेल्या लिंगा(व्दारव्हा) येथील शेतकरी देवीदास तुकाराम गायकी (वय: ५८) शेतात गळफास घेऊन आत्म हत्या केली. याप्रकरणी पोलिस पाटील विश्वनाथ पारसे यांनी लाडखेड पोलिसांत तक्रार दिली आहे. मृत तुकाराम गायकी यांच्याकडे नऊ एकर शेती आहे.

दर्यापूर (जि. अमरावती): इटकी येथील उमेश किसनराव बंड (वय: ३६) या शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केली सेवा सहकारी सोसायटी तसेच खासगी असे ४० हजार रूपयांचे कर्ज त्यांनी घेतले होते. गेल्या तीन ते चार वर्षापासूनची नापिकी असतानाच यावेळी पाऊस जास्त झाल्याने शेतात पेरलेले मुगाचे पीक वाया गेल्याने ते हताश होते. त्यांच्या पश्चात आई, पत्नी, व दोन मुले आहेत.

रिसोड (जि. वाशीम): वाही रायताळ येथील रामभाऊ नारायण पुंड(वय: ३५) या शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याचे घटना उघडकीस आली. त्यांच्यावर बँकेचे कर्ज असल्याची माहिती त्यांच्या निकटवर्तीयांनी दिली.

धाड (जि. बुलडाणा): देवपूर येथील राजधर तोताराम नरोटे (५०) या शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केली. त्यांच्याकडे दोन एकर जमीन असून त्यांच्याकडे जिल्हा सहकारी बँकेच्या चिखला शाखेचे २७ हजार रूपये कर्ज व मुलींच्या लग्नासाठी घेतलेली ३५ हजार रूपयांची उसनवारी आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा व दोन मुली आहेत.

vishal Yadav 9850291294
9921151199
इंडो प्रिंटर सर्व्हिसेस
Dot Matrix Specialist
■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carteridges & Toner Refilling
चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.
१ ली गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर

श्री भरत अर्बन को-ऑप बँक लि., जयसिंगपूर
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३
■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ सभासदांच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १३००० कर्ज १० टक्के व्याजदराने

ठेवी	कर्जे	ऑडिट वर्ग		स्वभांडवल	गुंतवणूक	एन.पी.ए.
४१४७.९५	२१७८.७१	----	नफ्यात	४५५.१५	२१८९.४३	३.३७ टक्के

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर
श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन व सर्व संचालक
पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन

आदिशक्ती कन्स्ट्रक्शन
जयसिंगपूर
प्रोप्रा. मिलींद साखरपे

TEXMO INDUSTRIES
Taro
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
SKF Ball Bearings
BCH स्टार्टर
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स
अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली, जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२१९८३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ, पटेल चौक, सांगली.
फोन नं.(०२३३) २६२९०९६ मोबा.:९९६०४०६३९३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारुती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266
Shree Datta Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.

जयसिंगपूर : येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या झालेल्या बैठकीत बोलताना राजेंद्र गड्ड्याण्णावर.

'स्वाभिमानी'ची नववी ऊस परिषद १५ ऑक्टोबरला

▶ पान १ वरुन

विकली जात आहे.

मात्र कृषी मंत्रालयाकडून म्हणावे तसे निर्यात धोरण होत नाही. सन २००५-०६ साली जागतिक बाजारपेठेत साखरेचे भाव तेजीत असाताना कृषीमंत्री शरद पवार यांनी साखरेवर निर्यातबंदी लादून देशांतर्गत साखरेचे भाव पाडले. त्यामुळे ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे अब्जावधी रूपयांचे नुकसान झाले. यंदाही तोच प्रकार कृषीमंत्री करण्याचा प्रयत्न करत आहेत. गेल्या वर्षी 'एफआरपी' शेतकऱ्यांवर लादून २२०० रुपये टनाला दर दिला. मात्र ३२०० रुपये शेतकऱ्यांच्या पदरात पडायला पाहिजे होते. गेल्या वर्षी मोठ्या प्रमाणात लेवीच्या नावाखाली ऊस उत्पादक शेतकऱ्यांची लुबाडणूक केली गेली. यंदा 'एफआरपी'ला प्रती टक्क्यास १३९.१२ पै. दर आहे. म्हणजेच शेतकऱ्यांना १६०० च्या आसपास दर जाईल असे शासनाच्या वतीने सांगण्यात येत आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेला एफआरपीची पद्धत अजिबात मान्य नाही. कारण शेतकऱ्यांना उसाच्या उत्पादन खर्चावर हमीभाव मिळाला पहिजे.

कृषीमंत्री शरद पवार यांनी नेहमीच शेतकऱ्यांच्या विरोधी असलेले धोरण अवलंबलेले आहे. कृषीमंत्रालयाकडून दरवर्षी मटक्याचे आकडे काढावेत तसे उसाचे दर काढले जात आहेत. रतन खत्रीची ही पद्धत बंद करा. सध्या बंद पडलेले चाळीस साखर कारखाने कोट्यवधी रुपयांचे पॅकेज देऊन सुरू करण्याचा प्रयत्न सरकार करीत आहे. संपूर्ण राज्यात जेमतेम १ कोटी टन उसाचे क्षेत्र वाढले असल्याचे सरकार सांगत आहे. यंदाचे बंद असलेले सुरू होणारे साखर कारखाने वाढीव ऊस पूर्ण क्षमतेने गाळल्यास उसाचे एक कांडेही शिल्लक राहणार नाही. शेतकऱ्यांनी एकत्रित येऊन संघटना करून आंदोलन करू नये, असा प्रयत्न सरकार करत आहे, कारण उसाचे क्षेत्र वाढलेले आहे. असे खोटे सांगून शेतकऱ्यांची शुद्ध फसवणूक साखरसम्राटांकडून होत आहे. आंदोलन केल्यास ऊस शिल्लक राहील, असा कांगावा सरकार करत आहे. ऊस शिल्लक राहील हे सर्व थोतांड आहे. कारण साखर कारखाने पूर्ण क्षमतेने चालवल्यास ऊस अजिबात शिल्लक राहणार नाही, तसेच साखर कारखान्यांची तोडणी यंत्रणा अधिक सक्षम केली गेली पाहिजे. आगामी ऊस परिषद १५ ऑक्टोबर रोजी जयसिंगपूरमध्ये होणार असून या ऊस परिषदेत किती भाव घ्यायचा हे आम्हीच ठरवू, आमच्या घामाचे दाम घेण्यास आम्ही सक्षम आहोत. येथून पुढील आंदोलनास साखर सम्राटांना वटणीवर आणण्यासाठी सर्व प्रयत्न केले जातील. असा सज्जड इशाराही त्यांनी दिला.''

जयसिंगपूर : येथे नूतन ग्रामपंचायत सदस्यांचा खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

स्वाभिमानी पक्षाचे जिल्हाध्यक्ष जालंदर पाटील म्हणाले, ''यंदाच्या ऊस आंदोलनात जिल्ह्यातील सर्व रस्ते बंद करून साखर सम्राटांना सळो की पळो करून सोडू. उग्र व आक्रमक स्वरूपाचे आंदोलन करून शेतकऱ्यांच्या घामाचे दाम पदरात पाडल्याशिवाय आम्ही गप्प बसणार नाही.''

जिल्हाध्यक्ष भगवान काटे म्हणाले, ''नुकत्याच झालेल्या ग्राम पंचायतीच्या निवडणुकीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेला भरघोस यश मिळाले आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटना तळागाळात रुजली असून येथून पुढे शेतीमालाच्या कोणत्याही आंदोलनात पूर्ण क्षमतेने उतरेल.''

उपाध्यक्ष उल्हास पाटील म्हणाले, ''शिरोळ तालुक्यात स्वाभिमानी संपली असे कोणाला वाटत असेल तर ते मूर्खपणाचे आहे. नुकत्याच झालेल्या ग्रामपंचायतीच्या निवडणुकीत स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आपली ताकद दाखवून दिली आहे.''

राजेंद्र गड्याण्णावर म्हणाले, ''येथून पुढे शेतीमालाचे भाव शेतकरीच ठरविणार. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आगामी ऊस आंदोलन उग्र व निर्णायक स्वरूपाचे केले जाईल साखर सम्राटांची अजिबात गय केली जाणार नाही, असा त्यांनी इशारा दिला.''

यावेळी प्रा. अमर कांबळे, सांगली जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील, महादेवराव धनवडे आदींनी आपले मनोगत व्यक्त केले. यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या नुतन सरपंच व १६० ग्रामपंचायत सदस्यांचा जाहीर सत्कार खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते करण्यात आला. या कार्यक्रमास माजी जिल्हाध्यक्ष बापूसो चौगुले, उपाध्यक्ष महादेवराव धनवडे, सावकर मादनाईक, डॉ. महावीर अक्कोळे, जिल्हा परिषद सदस्य जयकुमार कोले, प्रकाश परिट, हातकणंगले पंचायत समिती उपसभापती अरुण मगदूम, पंचायत समिती सदस्या सौ. प्रमिला पाटील, अंकुश कांबळे, श्रीकांत माळी, संभाजी मेंढे, संदीप राजोबा, सुरेश पाटील, सदाशिव कुलकर्णी आदींसह स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे हजारो कार्यकर्ते उपस्थित होते. स्वागत आण्णासो चौगुले तर प्रास्ताविक आदिनाथ हेमगिरे यांनी केले.

रघुनाथदादा चळवळीला बदनाम करू नका

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): शेतकरी संघटनेचे तथाकथीत व स्वंयघोषित नेते रघुनाथ पाटील यांनी ग्रामविकास मंत्री जयंत पाटील यांच्याबद्दल चांगले उद्‌गार काढून दोघांचेही पितळ उघडे पाडून घेतले. वास्तविक शेतकरी चळवळ ही शेतकऱ्यांच्याच मदतीवर चालत असते. हे रघुनाथ पाटील विसरलेले दिसतात. जयंत पाटील यांच्याबद्दल जे काही वक्तव्य केले त्यातील बऱ्याच गोष्टी सांगून गेल्या आहेत. त्यांच्या या स्टंटबाज आंदोलनामुळे शेतकरी चळवळ बदनाम होत आहे.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांना लोकसभेत पराभूत करण्यासाठी रघुनाथ पाटील यांनी जयंत पाटलांकडून सुपारी घेतलेली होती. अशी चर्चा वाळवा तालुक्यात सुरू होती. शेतकऱ्यांच्या मतात फूट पाडण्यासाठीच रघुनाथ पाटलांनी आपली उमेदवारी शिवसेनेतून भरलेली होती. रघुनाथ पाटील यांच्यात आक्रमकपणा प्रचंड आहे. पण स्वार्थीपणा व अंहकारपणा जास्त आहे. दुसरा कोण पुढे चालला की त्याचे पाय ओढायचे ही त्यांची पुर्वीचीच रीत आहे. तसेच कार्यकर्त्यांना वाऱ्यावर सोडून आपलेच खरे म्हणण्याची त्यांचीच पध्दत त्यांनाच मारक ठरलेली आहे. रघुनाथ पाटील यांच्यावर पूर्वीदेखील टीका होत होती नि सध्याही होत आहे. कोट्यवधी रूपयांचा कोंबडी प्रकल्प बंद पाडून अनुदान लाटले अशीही चर्चा वाळवा तालुक्यात सुरू आहे. आणखी चर्चेने जोर पकडला असून तो म्हणजे रघुनाथ पाटील यांनी बांधलेला अलिशान बंगला व अलिशान गाडी. यासाठी कोठून एवढी रक्कम आणली हाही चर्चेचा विषय आहे. त्यावर त्यांच्याच एका कार्यकर्त्याने सांगितले की रघुनाथ पाटलांनी कर्जे काढून बंगला बांधलेला आहे. अंहकारपणा, आपमतलबीपणा, पोकळ ध्येयवाद या गोष्टीच चळवळीला मारक ठरलेल्या आहेत. रघुनाथ पाटील ,यांच्यासारख्यामुळेच चळवळ बदनाम होत आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न सोडून इतर गोष्टीत यांना फार रस दिसत असल्याचे स्पष्ट होत आहे. राजू शेट्टीसारख्या चळवळ्या कार्यकर्त्याने एवढी मोठी उत्तुंग झेप घेऊन शेतकऱ्यांचे प्रश्न सोडवले म्हणून त्यांचे पित्त खवळून उठले आहे. असो रघुनाथ पाटलांनी शेतकऱ्यांसाठीच झटेत रहावे. मात्र त्यामुळे चळवळ बदनाम होता कामा नये. एवढे मात्र लक्षात असावे.

देशात उच्चांकी साखर उत्पादन
त्वरीत साखरेची निर्यात गरजेची

कोल्हापूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): देशात सध्या उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणात वाढलेले आहे. देशात सुमारे ५० लाख हेक्टर उसाची लागवड झालेली असून यंदा विक्रमी म्हणजेच दोन कोटी ८० लाख टन साखर उत्पादीत होणार आहे. त्यामुळे सरकारने आताच साखरेची निर्यात करणे गरजेची आहे.

यावर्षी चीन, पाकिस्तान, व रशिया या चीन देशांत दुष्काळ, महापूर आदी कारणांमुळे येथे साखरेचे उत्पादन कमी होणार आहे. ब्राझील व युरोपियन संघात तुलनेने साखर उत्पादन कमी होणार आहे. त्यामुळे यंदा जागतिक बाजारपेठेत साखरेला मागणी आहे. जागतिक बाजारपेठेत साखरेचे दर तेजीत आहेत. आपल्याकडे ९४ लाख टन साखर शिल्लक आहे. पाकिस्तानमध्ये साखरेचे भाव ७५ रूपये प्रतिकिलो असून त्यांना साखरेची मोठ्या प्रमाणात गरज आहे. सध्या भारत आणि ब्राझीलकडून ७५ हजार टन साखरेची निर्यात केलेली आहे. त्यामुळे शासनाने मोठ्या प्रमाणात साखरेच्या निर्यातीचे धोरण स्वीकारणे गरजेचे आहे. देशाला साखरेची गरज २ लाख २० हजार टन आहे. त्यामुळे यंदा १ लाख ५४ हजार टन साखरेचे अतिरिक्त उत्पादन होईल अशी चर्चा बाजारात सुरू आहे. मात्र यासाठी त्वरीत उपाय करणे गरजेचे आहे. कारण कृषीमंत्री शरद पवार यांनी २००५ - ०६ साली जागतिक बाजारपेठेत साखरेचे भाव चढ्याने असताना त्यावेळी साखरेवर निर्यात बंदी लादून देशाअंतर्गत साखरेचे भाव पाडण्याचे कारस्थान केले होते. हेच कारस्थान पुन्हा करू नये. सध्या साखरेचे भाव २६ रूपये किलो आहेत. पडून असलेल्या साखरेला मागणी आहे. त्याची त्वरीत निर्यात होणे गरजेचे आहे. राज्यात सरकारकडून अतिरिक्त उसाचा बागलबुवा सुरू आहे. यासाठी पॅकेज देऊन बंद असलेले ४० साखर कारखाने सुरू करण्याचा निर्णय सरकारने घेतलेला आहे. गेल्या वर्षीपेक्षा यंदा जवळपास एक कोटी मेट्रिक टन ऊस जास्त असेल असा अंदाज आहे. म्हणजेच अंदाजे ८ कोटी ८६ लाख टन उसाचे गाळप करावे लागणार आहे. मग बंद साखर कारखाने सुरू करून राज्यातील अतिरिक्त उसाचा प्रश्न संपुष्टात येणार आहे.

जयसिंगपुरात चित्रपट महोत्सव

जयसिंगपूर (प्रतिनिधी): फिल्म सोसायटी जयसिंगपूरच्या वतीने दि. १७ व १८ सप्टेंबर रोजी जयसिंगपूर नगरपालिकेच्या नाट्यगृहात चित्रपट महोत्सवाचे आयोजन केले आहे.

शुक्रवारी दि. १७ रोजी संध्या ६ वाजता डॉ. कोटणीस की अमर कहानी (हिंदी) हा चित्रपट दाखविला जाणार आहे. रात्री ९ वाजता बर्ड मायग्रेशन, दि. १८ रोजी संध्या ६ वाजता गुलाबी टॉकीज (कन्नड) तर रात्री ९ वाजता हरिशचंद्राची फॅक्टरी हा चित्रपट दाखविला जाणार आहे. तरी याचा लाभ घ्यावा असे आवाहन करण्यात आले आहे.

पांढऱ्या कपड्यातील उंदराकडून धान्याची नासाडी : खासदार राजू शेट्टी

सांगली (स्वाभिमानी वृत्तसेवा): केंद्रीय कृषिमंत्री शरद पवार यांना लोकसभेत प्रश्न विचारला होता. त्यावेळी त्यांनी ७० हजार टन धान्य गोदामात सडत असल्याचे सांगितले होते. हे धान्य उंदीर खात आहेत, असे त्यांचे म्हणणे आहे, पण प्रत्यक्षात हा गोरगरिबांच्या तोंडचा घास काळे उंदीर नव्हेत, तर पांढऱ्या कपड्यातील उंदीरच हिसकावून घेत आहेत, अशी घणाघाती टीका खासदार राजू शेट्टी यांनी केली.

डी. पी. आय. च्या दुसऱ्या राज्यव्यापी अधिवेशनाचे उद्‌घाटन खासदार राजू शेट्टी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. खासदार शेट्टी म्हणाले, देशातील गोरगरीबांच्या घशात जाणारे धान्य गोदामात सडते आहे. या धान्याची नासाडी चार पायांच्या उंदरांकडून सुरू आहे, गरीबांना हे धान्य ऐवजी ते उंदीर आणि घुशीच्या तोंडात जात आहे.

ते पुढे म्हणाले, कष्टकऱ्यांचे राज्य आणण्यासाठी आता दलित व शेतकऱ्यांनी एकत्र येण्याची गरज निर्माण झाली आहे. डी. पी. आय. च्या या अधिवेशनातून त्याची सुरूवात व्हावी, प्रस्थापित राजकारणी आपली दुकानदारी बंद पाडण्यासाठी तुमचे संघटन मोडून काढण्याचा प्रयत्न करतील. पण त्यांच्यापुढे गुडघे टेकू नका. सर्वसामान्यांच्या ताकदीवर नेता बनू शकतो, हे मी दाखवून दिले आहे.

खासदार शेट्टी म्हणाले, राजकारणाची गटारगंगा साफ करायची असेल, तर सज्जनांनीच यात प्रवेश करण्याची गरज आहे. यावेळी सदाभाऊ खोत यांनीही प्रस्थापित व्यवस्था बदलण्यासाठी दलित वर्ग व शेतकऱ्यांनी एक होण्याची आवश्यकता आहे, असे सांगितले. याप्रसंगी डी. पी. आय. चे अध्यक्ष सुकुमार कांबळे, नंदकुमार केदार यांचेही भाषणे झाली. अशोक वायदंडे यांनी स्वागत, प्रास्ताविक केले. कार्यक्रमास आयुब पट्टेकरी, अनिल कबाडे यांच्यासह डीपीय पक्षाचे व होलार समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

बोरगाव 'स्वाभिमानी'च्या अध्यक्षावर भ्याड हल्ला

बोरगांव (स्वाभिमानी वृत्तसेवा): चिकोडी तालुक्यातील बोरगांव येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांवतीने उभारण्यात आलेल्या उसाचा वजनकाटा बसविण्याच्या शुभारंभ प्रसंगी पुजेच्या मानपानावरून येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेते शाखाध्यक्ष सुनिल पाटील यांच्यावर साखरसम्राटांच्या स्थानिक गुडांनी प्राणघातक हल्ला केला. २५ ते ३० साथीदारांनी संगनमताने लोखंडी सळी, काट्यांनी बेदम मारहाण केली. या घटनेचा स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने निषेध व्यक्त करण्यात आले. दरम्यान जखमी सुनिल पाटील यांना जयसिंगपूर येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

साखर सम्राटांकडून होणारी उसाच्या वजनात नेहमीत काटामारी होत असते. ही लुबाडणूक थांबवण्यासाठी बोरगांव येथे शेतकऱ्यांनी एकत्र येऊन उसाचा वजनकाटा उभा करण्यात आला. दि. ३ सप्टेंबर ला वजन काट्याचे पूजन व महाप्रसाद असा कार्यक्रम घेण्यात आलेला होता. यावेळी येथील साखरसम्राटांचे पित्त खवळले होते. दरम्यान दि. ५ सप्टेंबर रोजी सुनिल पाटील हे त्यांच्या कामाकरीता महाराष्ट्र – कर्नाटक राज्याच्या सिमेवर आयकोसुत गिरणीजवळ असलेल्या स्टोन क्रशरकडे मोटारीकडे जात असताना २५ ते ३० गुंडानी काठ्या व लोखंडी सळीने भ्याड हल्ला केला. या हल्ल्यात स्वाभिमानीचे सुनिल पाटील गंभीर जखमी झाले. सशस्त्र हल्ल्याचे वृत्त समजताच बोरगांव परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या घटनेचा निषेध म्हणून स्वाभिमानीशेतकरी संघटनेच्या वतीने बोरगांव येथे कडकडीत बंद पाळण्यात आला. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी बोरगांव येथे भेट देऊन संघटनेचे अध्यक्ष सुनिल पाटील यांच्यावर झालेल्या भ्याड हल्ल्याचा तीव्र निषेध नोंदविला. राजकीय सुडबुद्दीने केलेल्या हल्ल्यास प्रतिउत्तर देण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटना सक्षम असल्याचे त्यांनी निक्षुण सांगितले. सहकार क्षेत्रातील असलेल्या गाव गुंडाचा कायमचा बंदोबस्त करण्यासाठी सदैव तयार असल्याचेही सांगितले. यावेळी माजी जि. प. सावकर मादनाईक, स्वाभिमानी पक्षाचे प्रधान सचिव डॉ. महावीर अक्कोळे, उदगांवचे उपसरपंच बाळासाहेब वरेकर आदी उपस्थित होते.

बोरगाव : हल्ल्यातील जखमी सुनील पाटील यांची चौकशी करताना खा. राजू शेट्टी.

लेवीच्या नावाखाली शेतकऱ्यांची लूट

लोकभेतून...

साखर कारखान्यांनी एकत्र येऊन लेवीच्या साखरेचे दर वाढविले आणि त्यांना स्वतःचा फायदा करवून घेतला, मात्र जे ऊस उत्पादक शेतकरी आहेत, याचा त्यांना काहीच फायदा मिळालेला नाही. साखर कारखानदारांनी एफआरपी चे सूत्र समोर ठेवून लेवीच्या साखरेचे दर वाढविले आहेत. तेच दुसरीकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांना उसाच्या उत्पादन खर्चावर दर मिळत नाही. याकडे सरकार कानाडोळा करत आहे. कृषी मूल्य आयोगाने सुचवलेल्या उपायांकडेही सरकारने दुर्लक्ष केले आहे. केवळ साखर कारखान्यांच्या हिशोबाप्रमाणे उसाचा एफआरपी ठरविला जात आहे. यामुळे हा ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्यावर अन्याय आहे. त्यांना फायदा दर अजिबात मिळत नाही.

जी साखर बाजारात विकली जाते, तेच साखर तयार करण्यासाठी किती खर्च येतो त्यावरच शेतकऱ्यांच्या उसाला दर दिला गेला पाहिजे. मात्र याकडेही सरकारने दुर्लक्ष केले आहे. साखर कारखानदारांना संरक्षण देऊन एफआरपी आणि लेवीचा दर ठरविला जात आहे. सरकारकडे मी मागणी करतो की, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादन खर्चावर हमीभाव त्यांना योग्य तो न्याय द्यावा, मात्र असे घडत नाही.

कृषी मूल्य आयोगाला योग्य ते अधिकार द्यायला पाहिजे, कारण त्यांच्या सूचनेला कोणच विचारत नाही. जे कृषी मंत्रालयाच्या मनात येते तोच भाव ठरविला जातो. अशाच पध्दतीने एफआरपी ठरवली जाते. खुल्या बाजारात जी साखर विकली जाते, त्यामध्ये शेतकऱ्यांची गुंतवणूक घेतली गेली पाहिजे. मात्र आता पाहिल्यास शेतकऱ्यांना घामाचे दाम मागण्याचा अधिकार नाही. कारण हा अधिकारच गमावून बसलो आहे. कारण शुगर कंट्रोल ॲक्ट १९६६ (५) ए च्या नुसार निकाल दिला आहे. माझी सरकारकडे मागणी आहे की, कलम ५ ए च्या बाबतीत पुर्नविचार केला गेला पाहिजे. कुठलीही उपपदार्थ असू दे अथवा साखर जर खुल्या बाजारात विकली गेली तर त्याचा फायदा शेतकऱ्यांनाही मिळाला गेला पाहिजे.

साखर कारखानदारांना दोन वर्षांपासून लेवीचा फरक मिळत आहे. मात्र ऊस उत्पादक शेतकऱ्यांना जे फरक मिळायला पाहिजे ते मिळतच नाही. मी कृषीमंत्र्याना विनंती करतो की, ऊस उत्पादकांचे थकीत बिल त्वरीत मिळवून द्यावे.

पन्हाळा : पन्हाळा तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पाटपन्हाळा शाखेच्या वतीने जंगली व फळांची ५०० रोपांचे वाटप करण्यात आले.

स्वाभिमानीतर्फे पाटपन्हाळ्यात जंगली रोपांचे वाटप

पन्हाळा(स्वाभिमानी वृत्तसेवा): पन्हाळा तालुक्यातील स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या पाटपन्हाळा शाखेच्या वतीने जंगली व फळांची ५०० रोपांचे वाटप करण्यात आले. प्राथमिक विद्यामंदीर पाटपन्हाळा व कै. द. रा. पाटील हायस्कूल विद्यार्थ्यांना रोपांचे वाटप करण्यात आले. संघटनेचे अध्यक्ष विठ्ठल पाटील व शिवाजी वर्डीगेकर यांच्या नर्सरीमधून रोपे देण्यात आली. यावेळी संघटनेचे कार्यकर्ते केरबा पाटील, संजय गुरव, प्रकाश गुरव, शंकर वाळवेकर, दगडू गुरव, सादू पाटील, बळवंत गुरव, बंडा गुरव, आनंदा कांबळे आदी उपस्थित होते.

भरत बँकेच्या अध्यक्षपदी विठ्ठल मोरे, तर उपाध्यक्षपदी अशोक रूणवाल

जयसिंगपूर (प्रतिनिधी): येथील श्री भरत अर्बन बँकेच्या अध्यक्षपदी पै. विठ्ठल मोरे, तर उपाध्यक्षपदी अशोक रूणवाल यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडीच्या अध्यक्षस्थानी दिनेश ए. चंदेल, उपनिबंधक सहकारी संस्था हे होते.

यावेळी बोलताना अध्यक्ष पै. विठ्ठल मोरे म्हणाले, बँकेचे संस्थापक कै. डॉ. एस. के. पाटील यांच्या विचारप्रणालीप्रमाणे कार्य करून तसेच रिझर्व्ह बँकेच्या धोरणानुसार व सध्याच्या स्पर्धेच्या युगात बँकेची सर्वांगीण प्रगती करून सभासदांचे हित जोपासून चालू साली डिव्हीडंड जाहीर केला असून रिझर्व्ह बँकेची परवानगी घेऊन लाभांशाचे लवकरच वाटप केले जाईल. यावेळी बँकेचे संचालक डॉ. जे. जे. मगदूम, श्रीमती अलका कुंभोजकर, चिफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर व्ही. बी. हुग्गे, बँकेचे सर्व संचालक आदी उपस्थित होते.

गुजरातचा आदर्श घ्या

नुकताच गुजरातचे मुख्यमंत्री नरेंद्र मोदी यांचे वक्तव्य वर्तमानपत्रातून प्रसिध्द झाले आहे की, राज्याच्या शेतीचा कृषी विकासदर १०.६ टक्के गाठून देशात आघाडी घेतले आहे. एकीकडे देशाच्या शेतीचा विकासदर २ टक्क्याहून कमी असताना गुजरातच्या शेतीचा विकास दर मात्र १०.६ टक्के गाठले आहे. ही गोष्ट गुजरातमधील शेतकऱ्यांच्या दृष्टीने अत्यंत आनंदाची नि सुखाची आहे.

गुजरात प्रथम राज्याची ओळख व्यापाऱ्यांचे राज्य म्हणून केली होती. व्यापाऱ्यांचा विकास करतानाच नरेंद्र मोदींनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने पाहिले. शेतकऱ्यांच्या विकास झाल्याशिवाय आपल्या राज्याचा विकास होणार नाही. हे त्यांनी यापूर्वीच ओळखले होते. सिंचन विकास, कृषी तंत्रज्ञानाचा शेवटच्या शेतकऱ्यांपर्यंत प्रवाही प्रसार, उत्पादनवाढीसाठी सर्व विभागांनी केलेले एकत्रित प्रयत्न यामुळे गुजरातने कृषी क्षेत्रात प्रगतीचा मोठा टप्पा गाठला आहे. शेतकऱ्यांना रस्ते, वीज, कृषी निविष्ठा आदी पायाभूत सुविधा उपलब्ध करून दिलेल्या आहेत. कृषिप्रक्रिया उद्योगांवर सर्वाधिक लक्ष केंद्रित केले आहे. अनेक नवीन उद्योग समूह कृषि क्षेत्रात येत आहे. यासाठी स्वतंत्र धोरणांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. सर्वाधिक प्रोटीनयुक्त गव्हाची जात आनंद कृषी विद्यापीठाने विकसित केली असून, त्याचे पेटंटही घेतले आहे. कच्छसह संपूर्ण गुजरातमधील आदिवासी व दुर्गम भागातील शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढविण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्यामुळे फुलांचे उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढले आहे. मुंबईत असे एकही मंदिर नाही, जेथे गुजरातही फुले वाहिली जात नाहीत. राज्याचे पशुधन व दुग्धव्यवसायामुळे शेतकऱ्यांमध्ये आर्थिक सुबत्ता आणली आहे. दूध उद्योगात गुजरात पहिल्या क्रमांकावर असून संपूर्ण दिल्लीला गुजरात दूध परवत असते. देशातील सगळ्यात मोठ्या डेअरीचा प्रकल्प असलेला अमूल दूध गुजरातमध्येच आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या घरा घरात सुबत्ता आलेली आहे. गुजरातला लागलेल्या दंगलीचा कलंक नरेंद्र मोदींनी काही अंशी का होईना पुसण्यात यशस्वी झालेले आहेत.

महाराष्ट्राचा विचार केला तर शेतकऱ्यांच्या आत्महत्यांचे राज्याची ओळख झाली आहे. एकेकाळी देशात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर होता. मात्र राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे राज्याची अवस्था भकाल झालेली आहे. देशाच्या अर्थकारणात मुंबईला फारच महत्व आहे. शेतकऱ्यांच्या विकासाचा डांगोरा पिटणाऱ्या आपल्या राज्यातील राजकारण्यांनी शेतकऱ्यांची वाटच लावलेली आहे. २ टक्क्याचा विकास दर ४ टक्क्यावर नेण्याचा प्रयत्नही असफल झालेला आहे. ज्येष्ठ पत्रकार पी.साईनाथ यांनी महाराष्ट्र शेतकऱ्यांची स्मशानभूमी बनलेली आहे. शेतकऱ्यांच्या आत्महत्येला महाराष्ट्रात पोषक वातावरण आहे. अशी सणसणीत टीका त्यांनी आपल्या लेखात मांडलेली होती. त्यावर सरकारचे बाहुले नरेंद्र जाधव यांनी ही टीका पुसण्याचा प्रयत्न केला. वस्तुस्थिती पाहिल्यास मात्र पी.साईनाथ यांच्याच बाजूलाचे जाते. होय हे खरेच आहे, महाराष्ट्र ही शेतकऱ्यांची स्मशानभूमीच बनलेली आहे. राज्याच्या कृषी विकासदर वाढविण्यासाठी कोणतेही प्रयत्न केले नाहीत. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव मिळावा म्हणून ठोस उपाययोजना केल्या नाहीत. एकीकडे विकासाचे गाजर दाखवून शेतकऱ्यांची भलावण करायचे नि त्यांची मते पदरात पाडून राज्यात सत्ता आणायची हा एककलमी कार्यक्रम राज्यातील सत्ताधाऱ्यांनी राबविलेला आहे.

माढ्याचे खासदार शरद पवार हे देशाचे कृषीमंत्री झाल्यापासून राज्याला काहीच फरक पडलेला नाही. साखर कारखानदारी मोडीत निघाली. शेतकऱ्यांच्या शेतीमालाला भाव न मिळाल्याने शेतीही मोडीत काढली गेली. अनेक प्रकल्प बंद पडले. कोणताही नवीन प्रकल्प राज्यात आला नाही. सगळे मोठे प्रकल्प गुजरातला गेले. केवळ उद्योगधंद्यावरच भर दिला गेला. शेजारच्या कर्नाटक राज्याची प्रगती पाहिल्यास आपलेही डोळे विस्मयचकीत होतील. इतर राज्याच्या तुलनेत महाराष्ट्र पिछाडीवर आहे. दुधाचे उत्पादनही वाढले नाही. राज्यात ११० लाख लिटर दूध दररोज लागते. एवढेही दूध आपल्या मिळत नसल्यामुळे दुधासाठई बाहेरील राज्यांना अवलंबून रहावे लागते. बेकारी, महागाई, गरीबी आदींनी राज्याला आपल्या कवेत घेतले आहे. आणखी किती महाराष्ट्राचे वाटोळे केले जाणार आहे. शेतकऱ्यांच्या जीवनमान उचांवे म्हणून एकही योजना राबविली गेली नाही. मग शेतकऱ्यांचे हीत तुम्ही कसे साधणार. राज्याच्या आर्थिर पाहणी अहवाल आपल्या डोळ्याखालून घातल्यास जनतेची मान शरमेने खाली घातले जाते. राज्यात १३ हजारांहून अधिक दूध संस्था या तोट्यात आहेत. कोट्यवधी रूपयांचा निधी गोळा केला नि तो निधी संचालकांनी आपल्या घशात घातला. हे सरकार शेतकऱ्यांचे वाटोळे करणारे सरकार आहे. जराही लाज मनात असली तर गुजरात आदर्श डोळ्यासमोर ठेवून महाराष्ट्रातील शेतीचा विकास करण्याचे ध्येय आतातरी अंमलात आणा. नाहीतर राज्यकर्त्यांना शेतकरीच या स्मशानभूमीत गाडतील यात शंकाच नाही.

– स्वाभिमानी वृत्तसेवा

माणगांवच्या सरपंचपदी स्वाभिमानी चे बाबासो जोग

माणगांव (प्रतिनिधी):माणंगाव ता. हातकणंगले येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे क्रियाशील कार्यकर्ते बाबासो रघुनाथ जोग यांची तर उपसरपंच पदी अविनाश जगदाळे यांची बिनविरोध निवड झाली. यावेळी अध्यक्षस्थानी इचलकरंजी पुरवठा निरीक्षक के. बी. देसाई हे उपस्थित होते.

यावेळी हातकणंगले पंचायत समितीचे उपसभापती अरूण मगदूम, माजी सरपंच अविनाश मगदूम, राजू मगदूम, के. बी. पाटील, सुकुमार पाटील, जिनगोंडा पाटील, नंदू शिंगे, दत्ता माणगांवे, प्रविण पाटील, सचिन बोरगांवे, अंकुश चव्हाण, शांतू पाटील आदी उपस्थित होते.

स्वाभिमानी शेतकरी तेलबियाणे खरेदी विक्री संस्थेची स्थापना

पन्हाळा(स्वाभिमानी वृत्तसेवा): वाघवे ता. पन्हाळा जि. कोल्हापूर येथे स्वाभिमानी शेतकरी तेलबियाणे खरेदी विक्री सहकारी संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. याबाबतचे नुकतेच मंजूरीचे पत्र सहाय्यक निबंधक एस. आर. धायगुडे यांनी दिली असल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष शामराव पाटील यांनी दिली . यावेळी वसंतराव पाटील, युवराज आडनाईक आदी उपस्थित होते.

दत्तवाड येथील स्वाभिमानी सोसायटीच्या अध्यक्षपदी आदाप्पा धोतरे बिनविरोध

दत्तवाड (स्वाभिमानी वृत्तसेवा): दत्तवाड (ता. शिरोळ) स्वाभिमानी शेतकरी विकास सेवा सोसायटीच्या अध्यक्षपदी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ कार्यकर्ते आदाप्पा संतू धोतरे तर उपाध्यक्षपदी शामराव सुतार यांती बिनविरोध निवड करण्यात आली. सभेच्या अध्यक्षस्थानी पिरगोंडा पाटील हे होते.

यावेळी संस्थेचे संचालक जयप्रकाश हेमगिरे, प्रकाश सिदनाळे, आदिनाथ हेमगिरे, राजू पाटील, चारित्र्य चौगुले, महावीर चौगुले, आनंदा जाधव, प्रविण स्वामी, सचिव महावीर हिरूकडे, बंडू हेमगिरे आदी उपस्थित होते.

किफायतशीर ऊस शेती करण्याचे तंत्र

सद्यपरिस्थितीत कमी खर्चाच्या सुधारित ऊस शेती तंत्राचा अवलंब करताना शेतकऱ्यांनी प्रामुख्याने पुढील गोष्टींचा विचार करावा.

१) प्रति हेक्टरी उत्पादकता वाढविणे. २) साखर उतारा जास्त मिळविण्यासाठी योग्य वाणांची निवड व योग्य वेळी लागवड करणे. ३) उत्पादन खर्च कमी करून निव्वळ नफा वाढविणे. ४) शाश्वत शेती करणे.

उत्पादन खर्च कमी करण्याचे पर्याय :

लागवडीचा हंगाम: राज्यात ऊस लागवडीमध्ये आडसाली, पूर्वहंगामी व सुरू हंगामाखालील या पिकाचे एकूण क्षेत्र अनुक्रमे १५ ते २० टक्के, २० ते २५ टक्के आणि १० ते १५ टक्के आहे. या तिन्ही हंगामांत घेतलेल्या पिकाचा कालावधी आणि उत्पन्नाचा विचार केला तर आडसाली हंगामात घेतलेल्या पिकाचे उत्पन्न जरी जास्त येत असले तरी दरनहा, दर हेक्टरी पूर्वहंगामात घेतलेल्या पिकाचे उत्पन्न जास्त मिळते. म्हणून आडसाली पिकाखालील क्षेत्र कमी करून पूर्वहंगामी क्षेत्रात वाढ करणे आवश्यक आहे.

लागवड पद्धती : पारंपरिक सरी वरंबा लागवड पद्धती ऐवजी पट्टा पद्धत (२.५ ५ फूट किंवा ३ ६ फूट) रुंद सरी पद्धतीचा अवलंब केल्यास प्रति हेक्टरी लागवड खर्चात रु. ७५० इतकी बचत होते. याशिवाय पट्टा लागवड पद्धतीत कमी कालावधीची आंतरपिके घेऊन उत्पादन खर्चात बचत करता येते. नफा वाढविता येतो. रुंद सरी अथवा जोडओळ पट्टा पद्धतीचा अवलंब केल्यास पाचटाचे, हिरवळीच्या पिकाचे आच्छादन करता येते. सुयोग्य पाणी व्यवस्थापनामुळे जमिनीची भौतिक सुपीकता सुधारण्यास मदत होते तसेच तणांचा प्रादुर्भाव कमी होऊन जमिनीच्या मशागतीचा खर्च कमी होतो.

बेणे : एकूण ऊस उत्पादन खर्चात १५ टक्के खर्च बेण्यावर होतो. पारंपरिक लागवड पद्धतीत बेण्याचा खर्च पट्टा पद्धतीपेक्षा जास्त आहे. पट्टा पद्धतीत तीन डोळा टिपरी ऐवजी दोन डोळा टिपरी लागवड केली असता बेणे खर्चात ३३ टक्केपर्यंत बचत होते; तर एक डोळा पद्धतीची लागवड केल्यास बेण्याच्या संख्येत व किमतीत ६६ टक्के बचत करता येते. (चौकट पाहावी.) पट्टा पद्धतीत एकूण बेण्यावरील आणि मजुरीवरील खर्च कमी येऊन अपेक्षित उसाची संख्या राखता येते व उत्पादन चांगले मिळते.

सुधारित अवजारांचा वापर : मजुरांची टंचाई आणि वाढत्या मजुरीमुळे प्रति हेक्टरी लागवडीचा खर्च दिवसेंदिवस वाढत आहे. मजुरांवरील खर्च कमी करण्याच्या दृष्टीने सुधारित अवजारांच्या वापरावर भर देणे गरजेचे झाले आहे. त्याद्वारे शेतीची कामे वेळेवर होऊन, हेक्टरी ऊस उत्पादन खर्च देखील कमी करता येणे शक्य आहे. लागवडीसाठी ऊस लागवड यंत्राचा वापर केल्यास सरी पाडणे, बेणे तोडणे, बेणेप्रक्रिया, बेणे अंथरणे, बेण्यावर माती झाकणे आणि खते मातीआड देणे ही कामे एकाच वेळी केली जातात. मजुरांवरील आणि इतर मशागतीच्या खर्चात हेक्टरी ४८ टक्के म्हणजेच जवळपास रु. ३००० इतकी बचत होते.

जिवाणू, सेंद्रिय खतांचा वापर : ऊस उत्पादनाच्या एकूण खर्चात ३० टक्के खर्च जैविक, सेंद्रिय आणि रासायनिक खतांवर होतो. रासायनिक खतांच्या वाढलेल्या किमतीमुळे खर्चात दुप्पट वाढ झाली आहे. त्यामुळे जिवाणू व सेंद्रिय खतांचा वापर करून रासायनिक खतावरील अतिरिक्त खर्च कमी करणे गरजेचे आहे. ॲसिटोबॅक्टर या नत्र स्थिर करणाऱ्या जिवाणू खतांचा वापर केल्यास रासायनिक नत्र खतात ५० टक्के बचत करता येते. याशिवाय स्फुरद आणि पालाश उपलब्ध करून देणारे जिवाणू वापरले तर स्फुरद आणि पालाशची उपलब्धता वाढते. बाजारात उपलब्ध असलेल्या सरळ व मिश्र खते यामधील कोणत्या रासायनिक खतांच्या वापरामुळे खर्च कमी होऊ शकेल, हे पडताळून पाहणेदेखील महत्त्वाचे आहे. सेंद्रिय खतास पर्याय म्हणून हिरवळीची पिके उदा. ताग व धैंचा ऊस लागवडीअगोदर घेऊन शेतात गाडली तर सेंद्रिय खतांवरील खर्चदेखील कमी करता येईल. याशिवाय ताग, धैंचा ही पिके जोरदार वाढतात; त्यामुळे तणांचा उपद्रव देखील कमी करता येतो.

सूत दरात किलोला तीस रुपयांची वाढ

इचलकरंजी, ता. ५ : शहरातील वस्त्रोद्योग व्यवसायाच्या इतिहासात सुताच्या दरात वाढ होण्याचा विक्रमया आठवड्यात नोंदवला गेला आहे. पाच किलोमागे तब्बल १२० ते १५० रुपये म्हणजेच किलोमागे तीस रुपये इतकी वाढ झाली आहे. यामुळे यंत्रमाग व्यवसायावर मंदीचे सावट पसरल्याचे चित्र आहे. या दरवाढीमुळे यंत्रमागधारकांना कोट्यवधींचा फ टका सहन करावा लागत आहे.

गेल्या आठ ते दहा दिवसांपासून सूत दरात सातत्याने वाढ होत आहे. सुरवातीस प्रति पाच किलोला ४० रुपयांची वाढ झाली. ही वाढ आठवडाअखेरीस तब्बल १२० ते १५० रुपयांपर्यंत पोचली. सध्या शहरात ६० काऊंट सुतास मोठी मागणी आहे. या सुताचे दर प्रति पाच किलो ९२० रुपयांवरून १०७० रुपयांपर्यंत पोचले आहेत. शहराच्या वस्त्रोद्योग व्यवसायाच्या इतिहासात ही दरवाढ आणि सुताचे दरही विक्रमी ठरले आहे. सद्यस्थितीत यंत्रमाग बंद ठेवून परवडत नसल्यामुळे यंत्रमागधारकांनी वाढीव दराने सूत खरेदी करून, कारखाने सुरू ठेवले आहेत. वाढीव दराच्या तुलनेत कापडाला दर मिळेलच याची खात्री देता येत नाही. कापड विक्रीनंतर

होणारा तोटा मोठा असल्याचे यंत्रमागधारकांनी सांगितले.

आताच्या दरवाढीबाबत विविध कारणे सांगितली जात आहेत. गिरण्यांनी दरवाढ केल्याचे सूत व्यापाऱ्यांकडून सांगण्यात आले. मिळालेल्या माहितीनुसार चीन आणि



इथे सतत दुष्काळ असतो, हवामानही विषम असतं! मला वाटतं वेगळं राज्य झालं तर बात नक्की फरक पडेल!!

तूर कीडनियंत्रणासाठी जैविक, रासायनिक पध्दत

पिसारी पतंग : या पतंगाची अळी हिरवट, तपकिरी रंगाची असते. अळीच्या शरीरावर लहान केस असतात. पतंगाचे पंख आखूड चिंचोळे असतात. पंखांची पहिली जोडी दोन तर दुसरी मागील जोडी तीन विभागांत विभागलेली असते. कडा केसाळ असून, पिसासारख्या दिसतात. म्हणून या किडींना पिसारी पतंग म्हणून ओळखतात. मादी पतंग कोवळ्या शेंगा, कळ्यांवर १७ ते १९ पर्यंत अंडी घालते. उबवण काळ तीन ते पाच दिवस असतो. अंड्यांतून बाहेर आल्यानंतर अळ्या १० ते २५ दिवसांत पूर्ण वाढतात. वाढ झालेली अळी छिद्रात किंवा दाण्याच्या बाहेरील बाजूस कोष करते. कोष १२ दिवसांत पूर्ण होऊन जीवनक्रम१७ ते ४२ दिवसांत पूर्ण होतो. अळी प्रथमशेंगांवरील कवच कुरतडते. दाण्यास छिद्र पाडून आतील भाग खाऊन टाकते.

लाल माशी : माशीची अळी मळकट पांढऱ्या रंगाची असून माशी काळ्या रंगाची असते. मादी माशी सूक्ष्मआकाराची असून, कोवळ्या तुरीच्या शेंगांवर आवरणाखाली अंडी घालते. अळी तूर दाण्यावर पाच ते दहा दिवसांत पूर्ण वाढते. अळी तुरीच्या दाण्यातच कोषावस्थेत जाते. चार ते तेरा दिवसांच्या कोषावस्थेनंतर माशी बाहेर पडते. कोष बारीक तपकिरी रंगाचे असतात. अंडी फुटून बाहेर पडलेल्या अळ्या (मॅगटस) कोवळ्या सालीच्या आतील भाग खातात. नंतर दाण्यात प्रवेश करून दाणे पूर्णपणे खाऊन टाकतात. प्रादुर्भाव झालेली शेंग पिळदार दिसते. सदरील शेंगांतील दाण्यांची डाळ होत नाही. या दाण्यांना आपण अडकण्या किंवा मुकण्या म्हणतो. प्रादुर्भावग्रस्त दाणे बियाणे म्हणून किंवा खाण्यालायक राहत नाहीत. त्यामुळे उत्पादनात ३० टक्क्यांपर्यंत घट येते.

बीन फ्लाय : या किडीचा प्रादुर्भाव तूर व्यतिरिक्त चवळी, सोयाबीन, इ. पिकांवर आढळते. ही कीड आकाराने सूक्ष्मतर १.९ मि.मी. लांब असून, चमकदार काळ्या रंगाची असते. पंख फिकट विटकरी रंगाचे असतात. अळ्या (पाय नसलेल्या) पांढऱ्या रंगाच्या असतात. शेतामध्ये तूर व इतर पिके वाढीला लागली की या माशीचा तेथे प्रादुर्भाव जाणवतो. मादी माशी पानांच्या देठावर लंबाकृती पांढऱ्या रंगाची अंडी घालते. अंडी फुटून बाहेर पडलेल्या अळ्या पानांच्या मध्यशिरेतून घसरत खोडात प्रवेश करते. अळीची वाढ खोडातच पूर्ण होते. अळीचे कोष लंबाकृती तीन मी.मी. लांब असतात. जीवनक्रमदोन-तीन आठवड्यांत पूर्ण होतो. इंगामात अनेक पिढ्या तयार होतात. अळी पानांच्या मध्य शिरेवरून खोडात प्रवेश करते. खोड पोखरून आतील भाग खाते. झाडे पिवळी पडतात. खोड विटकरी दिसते व हवेने मोडते. प्रादुर्भावग्रस्त तूर पिकातील शेंगांत दाणे भरत नाहीत. कमी संख्येने शेंगा लागतात. दाणे लहान होतात. उत्पादनात घट होते.



जैविक नियंत्रण पद्धती :

तूर व इतर पिकांच्या उपद्रवकारक किडींचे परोपजीवी किडींद्वारे किंवा विषाणूयुक्त जैविक कीटनाशकांद्वारे नियंत्रण करावे. या पद्धतीमध्ये परोपजीवी कीटक अथवा विषाणूचा वापर करता येतो. शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी हेलिओकिल (एचएनपीव्ही) हे प्रभावी विषाणूयुक्त जैविक कीटकनाशक ५०० मि.लि. (विषाणूग्रस्त अळ्यांचा अर्क), एक ग्रॅमनीळ आणि दहा मि.लि. कॉंबडीच्या अंड्यांचा बलक प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून प्रति हेक्टरी फुलोऱ्यात किंवा शेंगा लागतेवेळी सकाळी किंवा सायंकाळी प्रति हेक्टरी फवारावे. हे विषाणू अन्नाद्वारे अळीच्या पोटात जाऊन अळीच्या शरीरावर विषाणूंची वाढ होते. त्यामुळे अळ्या चार ते पाच दिवसांत मृत पावतात. अळीच्या वाढीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या अवस्थेत फवारणी करावी.

बनस्पतिजन्य कीटकनाशकांचा वापर :

शेंगा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी कडुलिंबापासून बनविलेले अॅझाडिरेक्टीन (१५०० पीपीएम) दहा मि.लि. प्रति दहा लिटर पाणी या प्रमाणात फवारावे.

रासायनिक पद्धती :

किडींचा प्रादुर्भाव आर्थिक नुकसानीच्या पातळीवर असतो तेव्हा गरजेनुसार रासायनिक कीटकनाशकांचा वापर करावा. पीक ५० टक्के फुलोऱ्यात असताना क्विनॉलफॉस (२५ टक्के प्रवाही ०.०४ टक्का), ८०० मि.लि. प्रति ५०० लिटर पाण्यात मिसळून किंवा धुरळणीसाठी कार्बारील भुकटी दहा टक्के, २० किलो प्रति हेक्टरी किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्का भुकटी, २० किलो प्रति हेक्टरी धुरळावी.

पीक फुलोऱ्यात आल्यावर किंवा लहान शेंगा अवस्थेत असताना वरीलपैकी एका कीटकनाशक भुकटीची धुरळणी वारा शांत असताना सकाळी किंवा सायंकाळी करावी. या कीडनाशकांच्या धुरीने शेंगा पोखरणारी अळी, शेंगांवरील ढेकण्या, पिसारी, पतंग, लाल माशी आणि शेंग माशीचे नियंत्रण होते.

इंधन अधिभारातून शेतकरी मुक्त होणार

राज्यातील शेतकरी २३०० कोटी रुपयांच्या वीजबिल इंधन अधिभारातून मुक्त होणार आहेत. पहिल्या टप्प्यात शेतीपंपावरील १५०० कोटी रुपयांचा अधिभार रद्द होणार आहे. या माफीमुळे शेतीपंपाचे बिल सरासरी वीस टक्क्यांनी कमी होण्याची शक्यता आहे.

हा इंधन अधिभार गेल्या दहा वर्षांतील आहे. इंधनाच्या किमतीत वेळोवेळी होणाऱ्या चढ-उतारानुसार तो कमीजास्त प्रमाणात आकारला जातो. तो रद्द करण्याचा निर्णय बऱ्याच वर्षांपूर्वी घेतला होता. मात्र त्यासाठीची रक्कम सरकारने वीज वितरण कंपनीला दिली नव्हती. राज्य मंत्रिमंडळाच्या गेल्या महिन्यात झालेल्या बैठकीत त्यावर बरीच वादावादी होऊन हा निधी वीज वितरण कंपनीला देण्याचा निर्णय घेण्यात आला. काँग्रेसच्या मंत्र्यांनी ही रक्कमदेण्यास विरोध केल्याची चर्चा होती. राष्ट्रवादीने मात्र या निर्णयाचे उघडपणे समर्थन केले होते. हा इंधन अधिभार शेतकऱ्यांनी कंपनीकडे आधीच भरला असल्याने तो त्यांना परत मिळणार आहे. याबाबत वीज वितरण कंपनीच्या अधिकाऱ्यांनी सांगितले की, प्रत्येक शेतकऱ्याचा किती इंधन अधिभार माफ होणार आहे, याची माहिती पुढील बिलात शेतकऱ्यांना दिली जाईल. हे कामबरेच किचकट असल्याने त्यासाठीची संगणकप्रणाली बसविण्याचे कामसुरू आहे. शेतकऱ्यांनी वीजबिल भरण्यास यामुळे प्रोत्साहन मिळेल, अशी अपेक्षा या अधिकाऱ्याने व्यक्त केली.

पहिल्या टप्प्यात राज्य सरकारने १५०० कोटी रुपये दिले असले तरी पुढील टप्प्यात आणखी ८०० कोटींचा प्रस्ताव आहे. पुरवणी मागण्यांमध्ये ही रक्कममिळेल, अशी वीज वितरण कंपनीला अपेक्षा आहे. तसा प्रस्ताव अर्थ विभागाकडे पाठविण्यात येणार आहे. राज्य मंत्रिमंडळात ऊर्जा मंत्रालयाचा 'दबदबा' पाहता ही रक्कममिळण्यासाही कोणतीच अडचण येणार नसल्याचे या अधिकाऱ्याने सांगितले.

शेतीपंपाची थकबाकी दोन हजार कोटींवर

राज्य सरकारने सहा वर्षांपूर्वी शेतकऱ्यांना वीजबिल माफी दिली होती. बिल न भरण्याची शेतकऱ्यांची मानसिकता तेव्हापासून कायमआहे. आताही राज्यात सुमारे दोन हजार कोटी रुपयांची थकबाकी शेतकऱ्यांकडे आहे. खुद्द ऊर्जामंत्री अजित पवार यांच्या बारामती तालुक्यात २२० कोटी रुपयांची थकबाकी आहे. ती न भरणाऱ्यांवर कारवाईचा इशारा त्यांनी जाहीर कार्यक्रमात दिला होता. मात्र तरी फारसा फरक पडलेला नाही.

तीनशे कोटी परत मिळणार

पुणे : महावितरणने वीजजोड देताना पायाभूत सुविधांसाठी आकारलेल्या रकमेचा परतावा संबंधित ग्राहकांना करावा, असा आदेश वीज नियामक आयोगाने दिला आहे. या आदेशाचा फायदा राज्यातील जवळपास एक लाख ग्राहकांना होणार असून, त्यातून या ग्राहकांना ३०० कोटी रुपये परत मिळणार आहे. महावितरणला ८ सप्टेंबर २००६ पासूनचा परतावा महावितरणला द्यावा लागणार आहे.

राज्यात २० जानेवारी २००५ ला नवीन वीज कायदा अमलात आला. प्रत्यक्षात त्याची अंमलबजावणी ८ सप्टेंबर २००६ पासून करण्यात आली. या कायद्यानुसार वीजजोड घेण्यासाठी ग्राहकाला 'कनेक्शन चार्ज' आणि एक महिन्याची अनामत रक्कमभरावी लागते; पण महावितरणने ग्राहकांना तत्काळ वीजजोड मिळावा यासाठी त्यांच्याकडूनच पायाभूत सुविधांचे पैसे वसूल केले. या पायाभूत सुविधांमध्ये खांब, वाहिनी, रोहित्र यांचा समावेश आहे. नवीन वीज कायदा अमलात आल्यानंतर पायाभूत सुविधांसाठी असा आकार लावणे बेकायदा असल्याने याविषयी महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने वीज नियामक आयोगाकडे एक याचिका दाखल केली होती. यावर निकाल देत आयोगाने १७ मे २००७ लाच हा परतावा देण्याचा आदेश महावितरणला दिला; पण महावितरणने तो अद्याप दिला नव्हता. संघटनेने पुन्हा आयोगाकडे धाव घेतली. त्यानंतर आयोगाने १ सप्टेंबर २०१० रोजी याबाबत पुन्हा आदेश दिले आहेत. या आदेशाचा फायदा शेतकरी, घरगुती ग्राहक, औद्योगिक आणि व्यापाऱ्यांना होणार आहे.

''२० जानेवारी २००५ पासून ८ सप्टेंबर २००६ पर्यंतचा परतावा मिळण्यासाठी आयोगाकडे नवीन याचिका दाखल केली आहे. यावरदेखील असाच निर्णय आयोग देईल, अशी संघटनेला आशा आहे. या काळातील जवळपास १५० कोटी रुपये ग्राहकांना परत मिळण्याची आशा आहे,'' अशी माहिती संघटनेचे अध्यक्ष प्रताप होगाडे यांनी दिली. जे ग्राहक या परताव्यासाठी पात्र असतील त्यांनी महावितरणशी संपर्क साधावा व महावितरणनेही असा ग्राहकांना कळविण्याचे आयोगाने आदेश दिले आहेत.

रघुनाथ पाटील यांचे वक्तव्य वैफल्यातूनच

राजू शेट्टी : चळवळ बदनाम करणारे वक्तव्य

सांगली : शेतकरी संघटनेचे नेते रघुनाथ पाटील यांनी ग्रामीण विकास मंत्री जयंत पाटील यांच्या विरोधात केलेले वक्तव्य वैफ ल्यातून असावे, अशी प्रतिक्रिया खासदार राजू शेट्टी यांनी आज येथे पत्रकारांशी बोलताना व्यक्त केली. ते म्हणाले, ''अशा वक्तव्याने चळवळ बदनाम होते, विश्वासार्हतेलाही तडा जातो. कोणा नेत्यांच्या पैशावर चळवळी चालत नाहीत, तर समाजाकडून उदार हस्ते मिळालेल्या मदतीवर त्या चालतात, चळवळ चालवताना आर्थिक ओढाताण करावी लागते. चळवळ केवळ आक्रमतेवर चालत नाही तर विश्वासार्हतेच्या आधारावर चालते, हे त्यांनी लक्षात घ्यायला हवे होते. '' रघुनाथ यांची माझ्याविरुद्धची उमेदवारी ही जयंत पाटील यांच्या सोयीसाठी नव्हे, तर शेतकरी चळवळीत फू ट पाडण्यासाठीच होती. रघुनाथ आमच्याबरोबर होते, त्यावेळी ते हाडाचे कार्यकर्ते होते. त्यांची गाडी आम्ही धक्का मारून सुरू करीत होतो; पण पूर्वीचे पाटील आता राहिले नाहीत, असेही ते म्हणाले. बारश्याआधी मृत्यूपत्र अजून कारखान्याचे हंगामसुरू झाले नाहीत, तोच उसाच्या जादा उत्पादनाची चर्चा सुरू आहे. शेतकऱ्यांना लुटण्याचे कारखानदारांचे षड्यंत्र आहे. गेल्या हंगामात ऊस दराची स्पर्धा लागली होती. आता जादा दर द्यावा लागू नये म्हणून शेतकऱ्यांची दिशाभूल केली जात आहे. जादा उत्पादनामुळे ऊस शिल्लक राहणार, ही चर्चा म्हणजे बारश्याआधी मृत्यूपत्र तयार करण्याचा प्रकार आहे.

म्हणजे सरकार आता मुबलक हवा आणि प्रकाश असणाऱ्या आपल्यासारख्या घरांना प्रोत्साहन देणार?

वृषभ मादनाईकच्या यशाबद्दल अभिनंदन

जयसिंगपूर (प्रतिनिधी): चिंचवाड (ता. शिरोळ) येथील वृषभ अजित मादनाईक याने एसएससी च्या परिक्षेत ५५० पैकी ५३३ गुण मिळवल्याबद्दल त्याचे अभिनंदन करण्यात आले. वृषभ हा मालू हायस्कूल चा विद्यार्थी असून चिंचवाड येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रमुख कार्यकर्ते वकील मादनाईक यांचा पुतण्या आहे.

छे, छे! आमची मैत्री अगदी अभेद्य आहे! वादविवाद, जाहीर अपमान, दगाफटका, कपट यांसारख्या दैनंदिन, किरकोळ गोष्टींमुळे तिला कधीही बाधा येणार नाही!!

गीर गाईची उपयुक्तता

गीर गाईचे वैशिष्ट्य

भारतीय गोधनापैकी असलेल्या विविध जातींपैकी काही जाती दुधासाठी तर, काही जाती शेती, ओढकामयासाठी प्रसिद्ध असतात. या दोहोंचा मिलाफ असलेल्या गीर गाईचा गोवंश गुजरात राज्याच्या पश्चिमआणि दक्षिण भागात मोठ्या संख्येने आढळतो. महाराष्ट्राच्या गुजरात सीमेजवळही गीर गाईचा गोवंश मोठ्या संख्येने आढळतो. गोवंशाची उत्तमदूध देण्याची क्षमता, जास्त स्निग्धांशाचे दूध, उत्तमशारीरिक गुण या गुणांचा अभ्यास करुन अमेरिकन शास्त्रज्ञांनीही तिची उपयुक्तता स्पष्ट केली आहे. या गाई प्रामुख्याने लाल भडक रंगाच्या त्यावर पांढरे ठिपके, क्वचितप्रसंगी लालसर काळा, संपूर्णपणे काळसर त्यावर ठिपकेसुद्धा असतात. या गाई उंच आणि मोठ्या शारीरिक बांध्याच्या, मस्तक मोठे व भरदार, शिंगे गोलाकार व मागून पुढे येणारी असतात. शिंगांचा रंग प्रामुख्याने काळसर असतो. कासेची ठेवण शरीराबाहेर येणारी गोल व मोठी असते. चारही आचळ लांबडे, एकाच उंचीचे व समान अंतरावर असतात. गीर जातीचे बैलही अशाच ठेवणीचे असतात. शांत, सुस्वभावी आणि मारकेपणाचा अभाव असलेले बैल शेतीच्या कामाला उपयुक्त असतात.

अधिक दूध मिळण्यासाठी...

सुबाभूळ, बहुवर्षीय आणि द्विदल जातीची वैरण असलेल्या शेवरी आदी झाडांचा चारा गीर गाईना उपयुक्त ठरतो. याशिवाय राहुरी येथील महात्मा फु ले कृषी विद्यापीठाने निर्माण केलेला यशवंत चारा, 'हिवाळी पीक' म्हणून उल्लेख होत असलेला बरसीमघास, संकरित जातीचे नेपीअर, रब्बी हंगामात सर्वात जास्त उत्पादन देणारे ओट, वैरण पिकांमध्ये सर्वात गुणसंपन्न, बहुवर्षीय लसूणघास, कोकणातील हलक्या आणि मुरमाड व निकृष्ट जमिनी, डोंगराच्या उताराचा भाग आदी ठिकाणी चांगले उत्पादन देणारे स्टायलो, मका, अल्पकाळात हाताशी येणारे चवळी वैरणपीक आदी पिकांचा गाईंची धष्टपुष्ट वाढ होऊन प्रतिकारक्षमता वाढविणे आणि जादा दूध मिळण्यासाठी उपयोग होतो.



जांभळाची लागवड करा

जांभळाची लागवड कोरडवाडू फळझाड म्हणून केली जाते. दक्षिण महाराष्ट्रात, बोर्ड महाबळेश्वर सांगोला या भागामध्ये बऱ्यापैकी केली जाते. जांभळे ही चवीस गोड असतात. तसेत मधुमेही रुग्णांना अतिशय लाभदायक आहे. नियमित जांभळे खाल्ल्याने रक्तातील साखरेचे प्रमाण कमी होण्यास मदत होते. जांभळामध्ये पाणी २८ टक्के, प्रथिने ०.७ टक्के, चरबी ०.२ टक्के, खनिजे ०.८ टक्के, कर्ब १९.७ टक्के असे घटक असतात. मधुमेही रुग्णांनी जांभळाच्या बियांची पावडर बडेसोपसारखे खाल्ले जाते. त्यामुळे मधुमेह आटोक्यात येऊ शकते. जांभळाच्या पावडर बरोबर मेथी, कारली, यांचा देखील आहारात वापर करावा. गोकाकची जांभळे प्रसिध्द असून रंगाने काळीशार गर्द व चवीला गोड असतात. तसे आकाराने फळे मोठे असतात. मे ते जून महिन्यात मिळणाऱ्या जांभळाला भरपूर दर मिळते.

जांभळे कोणत्याही हवामानात व सर्व प्रकारच्या जमिनीमध्ये लागवड करता येते. सीताफळ सारखे कोरडवाहू

भागामध्ये जांभूळ जास्त चांगले वाढते. शक्यतो जांभूळ बांधावर बरेच शेतकरी लागवड केलेली आहे.

जांभळाची लागवड ही बियांपासून रोपे तयार करून केली जाते. याकरिता मोठा मध्यम आकाराचा भरपूर व गोड गर असणारी फळे देणारी झाडे निवडावी. उत्कृष्ट दर्जाच्या फळातील बी, रोप तयार करण्यासाठी प्लास्टीकच्या पिशवीमध्ये बीया लावावीत. ४ ते ५ महिन्यांनतर पुन्हा दुसऱ्या प्लास्टीकच्या पिशवीत लावावीत. चांगली रोपे वाढल्यानंतर मुख्य शेतात जून – जुलैच्या महिन्यात लावावीत.

जांभळाची रोपे सर्वसाधारणपणे ९० ते १०० से.मी. पर्यंत बुध्यांवर फांद्या येऊ देऊ नयेत. जांभळाला ४ ते ५ वर्षांपासून फळे मिळण्यास सुरूवात होते. एक लक्षात ठेवणे गरजेचे आहे की, जेवढे झाड उंच व पसारा अधिक तसे फळे जास्त येतात. बांद्यावर सुध्दा २० – २५ फूट अंतरावर रोप लावता येतात. जांभूळची लागवड करावयाची झाल्यास १०० ते ११० झाडे बसतात. ८ ते १० वर्ष वयाच्या झाडापासून १०० ते १२५ कि. पर्यंत माल निघतो. बाजारात ४० ते ६० रूपये किलो भाव सहज मिळू शकतो. यावरून एकरी कमीत कमी भाव मिळाले तरी दोन लाख रूपयापर्यंत उत्पन्न सहज मिळू शकतो. जांभळाचे सरबत व बियांची पावडर औषधी म्हणून फारच उपयोगी आहे. तरी त्याचा फायदा घ्यावा. काढणी– जांभळे पूर्ण पिकल्यावरच व काळसर गर्द झाल्यानंतर काढणी करता येतात. चांगल्या वाढलेल्या झाडापासून १०० ते २०० किलोपर्यंत सहद फळे मिळू शकतात.

पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५